**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Academic : (0240) 2403118/119 /115
Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :: **शैक्षणिक विभाग** ::

## * परिपत्रक *

## संशोधन केंद्र मार्गदर्शक तत्वे

**संदर्भः**

१. एम.फिल./ पीएच.डी. पदवी प्रदान करणे/ नोंदणी करणे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमीत केलेले रेगुलेशन-२०१६, दि. ०५ मे, २०१६.
२. एम.फिल./ पीएच.डी. पदवी प्रदान करणे/ नोंदणी करणे संदर्भात विद्यापीठाने निर्गमीत केलेले सुधारीत अध्यादेश-१००९ (G), दि. १५.१२.२०२०.
३. विद्यापीठाने संशोधन केंद्रांना मान्यता देणेसंदर्भात निर्गमीत केलेले परिपत्रक दि. ०७.०७.२०२१.
४. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १११ (१) ते (८) अन्वये करण्यात आलेली तरतुद.

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे सर्व प्राचार्य, संलग्नीत महाविद्यालये /संचालक, संशोधन केंद्र यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १११ (१) ते (८) व विद्यापीठ अध्यादेश-१००९ (G) अन्वये विहीत केल्यानुसार मान्यता प्राप्त संशोधन केंद्राकडे आवश्यक पायाभूत सुविधा, साधनसामुग्री, उपकरणे, निर्धारीत प्रवेशक्षमता, संशोधन मार्गदर्शकांची संख्या, अनुज्ञेय शुल्क, संशोधन केंद्राचे नुतणीकरण इत्यादी व तत्सम बाबीसंदर्भात खालील प्रमाणे विनिर्दिष्टीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

१. प्रस्तुत प्रकरणी सर्व संशोधन केंद्र प्रमुख/ प्राचार्यांनी सदरील संशोधन केंद्रामध्ये उपलब्ध पायाभुत सुविधेनुसार व संलग्नीत संशोधन मार्गदर्शकासह उपलब्ध संशोधन मार्गदर्शकाच्या संख्येप्रमाणे किती विद्यार्थी संशोधन कार्य एकाच वेळेस किंवा विद्यमान शैक्षणिक वर्षामध्ये करु शकतात याबाबतची अद्ययावत माहिती दरवर्षी नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होणाऱ्या पहिल्या आठवडयात विद्यापीठास सादर करणे बंधनकारक आहे.
२. प्रस्तुत प्रकरणी संलग्नीत महाविद्यालयातील मान्यता प्राप्त संशोधन केंद्राचे स्वतःचे संशोधन मार्गदर्शक व संलग्नीत संशोधन मार्गदर्शक यांना अनुज्ञेय असलेल्या कोटयानुसार व संशोधन केंद्राच्या प्रवेश क्षमतेप्रमाणे managable कोटयानुसार (व्यवस्थापित करण्यायोग्य) संशोधन मार्गदर्शकनिहाय सर्व संबंधीत मार्गदर्शकांकडे संशोधनाचे कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवर्गनिहाय संख्या व रिक्त जागा याबाबतची माहिती विद्यापीठास प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या आठवडयात किंवा विद्यापीठ वेळोवेळी निर्देश देईल त्या मुदतीच्या आत सदरील माहिती विद्यापीठास सादर करण्यास आवश्यक आहे अन्यथा रिक्त जागेबाबतचा तपशील विचारात न घेता विद्यापीठाकडे उपलब्ध असलेल्या माहिती नुसार पीएच.डी. प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
३. विद्यापीठ अध्यादेश-१००९ अन्वये विहीत केल्यानुसार सर्व संलग्नीत महाविद्यालयातील संशोधन केंद्रांनी पीएच.डी. अभ्यासक्रमाबाबत विहीत केलेल्या प्रक्रियेनुसार DRC/ RAC समिती गठीत करणेबाबत सर्व संबंधीत महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रांनी आपल्या स्तरावरुन यथायोग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.
४. पीएच.डी. अभ्यासक्रम पुर्ण करीत असलेल्या संशोधक विद्यार्थ्याकडून विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या अध्यादेशानुसार विहीत केलेले शुल्क आकारण्यात यावे तद्अनुषंगाने विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या शुल्का व्यतिरिक्त विद्यार्थ्यांनकडून शुल्क आकारल्यास उक्त प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबत कृपया गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

५. प्रस्तुत प्रकरणी संशोधन केंद्रांनी संशोधनाबाबतचे सहामाही प्रगती अहवाल विहीत मुदतीत विद्यापीठास सादर करणे, संशोधन केंद्रांनी Pre Synopsis Submission नंतर सादरीकरण आयोजित करुन तसा अहवाल विद्यापीठास सादर करणे, विद्यार्थ्यांचे उपस्थिती अहवाल नियमितपणे विद्यापीठास सादर करणे, संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणे, अद्ययावत संगणक संच, साहित्य व साधनसामुग्रीसह प्रयोगशाळा अद्ययावत ठेवणे, ग्रंथ व नियतकालिके, इंटरनेट सुविधा, आरो वॉटर सुविधा, विज सुविधा, संशोधन कामी आवश्यक मनुष्यबळ, सुरक्षतेच्या संदर्भात सुरक्षा मानकांचे अनुपालन करणे, प्राण्यावर संशोधन करतांना IAEC या समितीने निर्धारीत केलेल्या मानकांचे अनुपालन करणे, विहीत मुदतीत विहीत शुल्कासह संशोधन केंद्राचे नुतणीकरण करणे, नियमानुसार विहित शैक्षणिक शुल्क विद्यापीठास सादर करणे, डेड स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे, विद्यापीठाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे नियमितपणे अनुपालन करणे इत्यादी व तत्सम बाबींचे संशोधन केंद्रांनी आपल्या स्तरावरुन अनुपालन करणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत प्रकरणी संशोधन करणाऱ्या ज्या संशोधक विद्यार्थ्यास विद्यापीठ अनुदान आयोग तसेच इतर केंद्र व राज्य स्तरीय प्राधिकरणाने एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी JRF/ SRF फेलोशिफ मंजूर केलेली आहे, अशा विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी नाव नोंदणी करावयाची असेल, अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विहित शैक्षणिक दस्तऐवजासह संशोधन व मान्यता समिती समोर सादर करण्यासाठी विद्यार्थी निहाय/ अभ्यासक्रम निहाय/ विषय निहाय संशोधन केंद्र प्रमुखाच्या शिफारशीसह विहित मुदतीत विद्यापीठास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व मान्यता प्राप्त संशोधन केंद्रांनी उपरोक्त प्रमाणे विनिर्दिष्टीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करुन तसा अहवाल विद्यापीठास वेळोवेळी सादर करणे अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

संदर्भ क्र. परीपत्रक /शैक्षणिक विभाग/२०२१-२२/ 1015-22

दि. १४.०९.२०२१.

**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग**

**प्रतीलिपी:**

१. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
३. संचालक, उपपरिसर, उस्मानाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
४. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, विद्यापीठ मुख्य परिसर/ उपपरिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
५. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये/ संशोधन केंद्र प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
६. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
७. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
८. समन्वयक, एम.के.सी.एल. राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

--=**=--